# नकाराची भीती

"अहो काय सांगू... मीनलला कोणीच हो म्हणत नाही. आजकालच्या मुलांना काय नेमकं काय हवं आहे कळतच नाही.", सुचित्राताई जवळपास रडायच्याच बाकी राहिल्या होत्या. आपल्या गुणी मुलीला मिळणारे नकार पचवणं त्यांना कठीण जात होतं. असाच एकदा मागे एक मुलगा भेटायला आला होता. ईशान त्याचं नाव. डबल ग्राज्युएट, भरपूर पगार, स्वतःची कार, पुण्यात एक बंगला, दिसायलाही उंचा पुरा आणि देखणा. कोणत्याही मुलीच्या बापाने पसंत करावा असा हा मुलगा. पण तरी मुलींकडून नकार येत होते. आणि हे नकार ऐकून तो थकला होता. त्याचा आत्मविश्वासही खचला होता. आणि त्याने असा निर्णय घेतला होता की तो आपण होऊन आता कोणालाही संपर्क साधणार नाही.

स्वतःला अनुरूप असा जोडीदार शोधण्याच्या या प्रवासात नकार मिळणे हे अनेक पालकांना आणि मुलांना क्लेशदायक वाटतं. त्यांना तो व्यक्तिगत अपमान देखील वाटतो. गोऱ्या इंग्रजाने रंगाने काळ्या गांधीजींना रेल्वेच्या डब्यातून धक्का मारून बाहेर काढलं तसंच काहीसं आपल्याबाबतीत घडतं आहे अशी नकार ज्यांना मिळतो त्यांची प्रामाणिक भावना असते. आणि मग याला प्रतिक्रिया उमटते ती राग, नैराश्य, वैताग आणि चिंता या माध्यमांतून. काहीवेळा नकार मिळालेली मुलं-मुली आत्मविश्वास गमावून बसतात, न्यूनगंड बाळगतात आणि मग कधीकधी न्यूनगंडामधून अनावश्यक आक्रमकता स्वभावात येते. एका नकार या गोष्टीमुळे अनेकांच्या आयुष्यात एवढी उलथापालथ होते. आणि हे सगळं होण्याचं मूलभूत कारण असतं ते म्हणजे 'माझ्या स्थळाला मिळालेला नकार म्हणजे एक व्यक्ती म्हणून मला नाकारणे होय.' ही ठाम (गैर)समजूत! सुचित्राताई अशा चिंतेत होत्या की त्यांच्या मुलीमध्येच काहीतरी कमतरता आहे की काय. ईशानला देखील मनात असं कुठेतरी वाटल्याने त्याने पटकन स्वतःच्या कोशात जाणं पसंत केलं.

आता नेमकी कुठे गडबड होते आहे ते समजून घेऊया. समजा, एखाद्या कंपनी मध्ये नोकरीसाठी तुम्ही इंटरव्ह्यूला गेलात. पण ती कंपनी म्हणली की, 'आम्ही तुमची निवड करू शकत नाही कारण आम्हाला टेक्निकल एक्स्पर्ट हवा आहे आणि आणि तुमचं क्षेत्र हे फायनान्स आहे.' आता याचा अर्थ तुम्ही माणूस म्हणून चूक आहात आणि तुम्हाला कशातलंच काही कळत नाही असा अर्थ घेऊन आपण दुसऱ्या एखाद्या कंपनीत फायनान्सविषयी असणाऱ्या पदासाठीदेखील अर्ज करणे थांबवाल काय? अगदी हेच इथेही लागू होतं. जेव्हा एखादी व्यक्ती तुम्हाला नकार देते तेव्हा त्याचा अर्थ इतकाच की त्यांना ज्यापद्धतीची व्यक्ती जोडीदार या पदासाठी हवी आहे त्यात तुम्ही बसत नाहीत. तुम्हाला व्यक्ती म्हणून नाकारण्याचा उद्देश आणि अधिकारही इतर कोणालाही नाही. उलट एखाद्या व्यक्तीने नकार दिल्यास तुम्ही त्यांचे आभार मानले पाहिजेत, ते दोन कारणांसाठी- एक म्हणजे स्पष्टपणे सांगितल्याबद्दल आणि दुसरं म्हणजे 'ही व्यक्ती आपल्या जोडीदाराच्या व्याख्येत बसत नाही' याची वेळीच त्यांना जाणीव झाल्याबद्दल. विचार करा, ही जाणीव समोरच्या व्यक्तीला लग्नानंतर झाली तर नंतर सहजीवनात किती वादळे निर्माण होतील. पण हे सगळं टाळल्याबद्दल त्यांचे किमान मनोमन तरी आभार मानायला काय हरकत आहे?!

एखाद्याला नकार देणे म्हणजे समोरच्याला एक व्यक्ती म्हणून नाकारणे नव्हे हे जसं नकार घेणाऱ्यांनी समजून घेतलं पाहिजे तसंच ते नकार देणाऱ्यांनीही समजून घेतलं पाहिजे. अनेकदा असं दिसून येतं की नम्रपणे नकार देणं हे भल्याभल्यांना जमत नाही. एकजण माझ्याकडे आले होते ते बोलता बोलता सहजपणे म्हणाले, "अहो फार चांगली चांगली स्थळे येतात मुलीला. पण काही ना काही कारणामुळे नकार असतो आमच्याकडून. आता इतक्या चांगल्या मुलांना नकार कसा कळवणार हा प्रश्नच पडतो.", त्यांच्या या प्रस्तावनेमुळे माझी उत्सुकता वाढली,

“मग करता काय अशावेळी तुम्ही”, माझा प्रश्न. “काही नाही हो... सरळ सांगून टाकतो आमचे गुरुजी म्हणतात पत्रिका जुळत नाही...!!” आजकाल नकाराच्या या कारणामागे असणाऱ्या अर्थाचा पत्ता सर्वांनाच लागला आहे. तेव्हा नकार देताना पत्रिका असा उल्लेख केला की समोरचेही समजून घेतात की हा स्पष्ट नकार आहे. म्हणजे ते म्हणतात तसं- ‘मांजर मेल्याचे सर्व वर्णन करायचे पण चुकूनही ‘मांजर मेले’ असा उल्लेख करायचा नाही.’ असा हा बनेलपणा लग्नासारख्या नात्याच्या बाबतीत करावा का हा प्रश्न आपल्याला पडला पाहिजे. नवरा-बायकोचं नातं, दोन कुटुंब जोडणारं नातं याला आपल्या समाजव्यवस्थेत अनन्यसाधारण महत्व आहे. ते प्रामाणिकपणावर आधारलेलं असावं अशी अपेक्षा आहे. आपल्याला अनुरूप असा जोडीदार निवडीच्या प्रवासात ‘पत्रिका जुळत नाही’ अशी ढोंगी उत्तरं देण्याची मानसिकता असलेल्या कुटुंबाशी आपलं जुळलं नाही हे बरंच झालं असं उत्तर स्वीकारणाऱ्या मंडळींनी लक्षात घ्यावं.

एकुणात सांगायचा मुद्दा हा की, दिल्लीला जाणाऱ्या माणसाने आग्र्याला रेल्वे थांबल्यावर न उतरणे म्हणजे त्या नितांतसुंदर ताजमहालाचा अपमान नसतो. आज मला दिल्लीला जायचं आहे असं म्हणून आपण स्वस्थ राहतो, इतकंच. ‘नकार’ या गोष्टीची तो देणाऱ्यांनी आणि तो स्वीकारणाऱ्यांनीही भीती बाळगण्याची गरज नाही. तो जोडीदार निवडीच्या यात्रेतला अविभाज्य भाग आहे. नकाराला मानापमानाच्या तराजूत न तोलता, लायकीच्या भाषेत न जोखता, स्वीकारायला आपण शिकू तो सुदिन! एखादा नकार देण्यामागची कारणे योग्य की अयोग्य, ते कसं ठरवायचं, कोणी ठरवायचं या सगळ्याविषयी बरीच चर्चा व्हायला हवी आहे, पण ती आता पुढच्या लेखात!